www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–27 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, ९ मार्च 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने –4

**अंधाराशी झुंजणाऱ्या 'विद्युलता' : विद्युत क्षेत्रातील स्त्रीशक्तीचा तेजस्वी प्रवास**

सविस्तर वृत्त पान ३ वर

## भारतीय संघ टी–२० वर्ल्ड कप चॅम्पियन; घरच्या मैदानात इतिहास रचला; न्यूझीलंडला दिली मात



**अहमदाबाद :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यात फायनल सामना रंगला. या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत २५५ धावांचा डोंगर उभारला. न्यूझीलंडला फायनल सामन्यात १५९ धावा करु शकले. भारतीय संघाने फायनल सामना ९६ धावांनी जिंकला. भारतीय संघ २०२६ चा टी–२० विश्वचषकाचा फायनल सामना जिंकला आणि चॅम्पियन बनला. फायनल सामना जिंकताच भारतीय संघाने इतिहास रचला.

भारतीय संघाने इतिहास रचला तिसऱ्यांदा ट्रॉफी जिंकणारा भारत पहिलाच देश ठरला. तर घरच्या मैदानावर टी–२० वर्ल्ड कप जिंकणारा भारत हा पहिलाच देश ठरला. सलग दोन वर्ल्ड कप जिंकणारा भारत हा पहिलाच देश ठरला. म्हणजे टी–२० विश्वचषक जिंकलाच नाही तर त्यासोबतच भारतीय संघाने इतिहास रचला. अभिषेक शर्मा, संजू सॅमसन आणि इशान किशन यांच्या स्फोटक खेळीच्या जोरावर भारताने २५५ धावांचा मोठा आकडा उभारला आणि न्यूझीलंडसमोर विजयासाठी २५६ धावांचे लक्ष्य ठेवले.

अभिषेक आणि संजू यांनी केवळ ७.१ षटकांत ९८ धावांची सलामी भागीदारी करत टीम इंडियाला चांगली सुरुवात दिली.

टीम इंडियाने आयसीसी टी२० विश्वचषक फायनलच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. अभिषेकने २१ चेंडूत ५२ धावा, संजू सॅमसनने ४७ चेंडूत ८९ धावा आणि इशान किशनने २५ चेंडूत ५४ धावा केल्या. शेवटी दुबेने ८ चेंडूत २६ धावा केल्या. न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनरने नाणेफेक जिंकली आणि भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. भारतीय संघाने साम न्यात कोणताही बदल केला नाही, तर न्यूझीलंडने एक बदल केला. २५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंड कधीही विजयाच्या शर्यतीत नव्हता. टिम सेफर्टच्या ५२ आणि कर्णधार मिचेल सँटनरच्या ४३ धावा वगळता, इतर कोणत्याही किवी फलंदाजाला प्रभावी खेळी करता आली नाही. या सामन्यात डॅरिल मिशेलने ११ चेंडूत १७ धावा केल्या.

भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक चार बळी घेतले. अक्षर पटेलने तीन फलंदाजांना बाद केले. हार्दिक पंड्या, वरुण चक्रवर्ती आणि अभिषेक शर्मा यांनीही प्रत्येकी एक बळी घेतला.

## फायनलमध्ये भारतीय फलंदाजांचा स्फोट; पाकिस्तानचा १७ वर्षांचा विक्रम मोडीत

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारत आणि न्यूझीलंड मध्ये सुरू असलेल्या फायनल सामन्यात प्रथम फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये २५५–५ धावा केल्या आहेत. आजही संजू सॅमसन याने ८९ धावांची आक्रमक अर्धशतकी खेळी करत भारताला एक आक्रमक सुरुवात करून दिली. भारताकडून संजू सॅमसन ८९ धावा, अभिषेक शर्मा ५२ धावा आणि ईशान किशन ५४ धावा केल्या. संजू आणि अभिषेकने ६ ओव्हरमध्ये ९२ धावा केल्या होत्या. वर्ल्ड कपच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या रचली.



सर्वात संजू सॅमसनयाने सलग तिसरी अर्धशतकी खेळी केली, परंतु आजही तो शतकापासून वंचित राहिला. सेमी फायनलमध्ये ही त्याने ८९ धावाच केल्या होत्या. आजच्या सामन्यातही ८९ धावांवरच आऊट झाला. संजू सॅमसन फायनलमध्ये भारताकडून सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला आहे. संजू सॅमसन यांने गौतम गंभीर आणि विराट कोहली यांचे रेकॉर्ड मोडले आहेत. या यादीमध्ये पहिल्या क्रमांकावर विराट कोहली होता, कोहलीने २०१४ मध्ये श्रीलंकेविरूद्ध ७७ धावा केल्या होत्या. म ागील २०२४ वर्ल्ड कपमध्ये २०२४ मध्येही दक्षिण आफ्रिकेविरूद्ध ७६ धावा तर गंभीरने २००७ साली पाकिस्ताविरूद्ध ७५ धावांची खेळी केली होती. मात्र संजूने आजच्या साामन्यात हे सर्व रेकॉर्ड मोडले आहेत. वर्ल्ड कप फायलनमध्ये वैयक्तिक सर्वाधिक धावा करणारा भारतीय खेळाडू नाहीतर जगातील पहिला खेळाडू ठरलाय. हा रेकॉर्ड वेस्ट इंडिजच्या सॅम्युल्सच्या नावावर होता. सॅम्युल्सने २०१६ मध्ये इंग्लंडविरूद्ध नाबाद ८५ धावा केल्या होत्या. २०२१ मध्ये केन विलियमसनने ऑस्ट्रेलियाविरूद्ध ८५ धावा केल्या होत्या. २०१२ मध्ये सॅमुल्यनेच श्रीलंकेविरूद्ध ७८ धावांची खेळी केलेली. मात्र संजूने आता सर्वांना मागे टाकत ८९ धावा करत इतिहास आपल्या नावावर केला आहे.

दरम्यान, संजू सॅमसन याने ४६ चेंडूत ८९ धावा त्याने केल्या होत्या. यामध्ये त्याने ५ चौकार आणि ८ षटकारांची आतषबाजी केली. यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडू ठरला आहे. संजूचे सेमी फायनलमध्ये शतक हुकले आणि आजही तो ८९ धावांवर आऊट झाल्याने सर्वांना वाईट वाटलं.

**पाकिस्तानचा विक्रम मोडला**

टी–२० विश्वचषकाच्याइतिहासात पहिल्यांदाच एखाद्या संघाच्या सलामीवीर जोडीने अंतिम सामन्यात ५० धावांची भागीदारी केली आहे, ज्यामुळे पाकिस्तानचा विक्रम मोडला आहे. यापूर्वी, अंतिम सामन्यात कोणत्याही संघासाठी सर्वाधिक सलामीवीर भागीदारी ४८ धावांची होती. ही भागीदारी २००९ च्या लॉर्ड्स टी–२० विश्वचषकात श्रीलंकेविरुद्ध पाकिस्तानकडून कामरान अकमल आणि शाहझैब हसननी केली होती.

## जागतिक महिला दिनानिमित्त दुचाकी वाहन रॅली



रांजणगाव शेंणपुंजी येथे जागतिक महिला दिनानिमित्त दुचाकी वाहनांची रॅली काढण्यात आली. वाहन रॅलीचे आयोजन मोहिनी दिपक बडे यांनी केले होते. यास महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. फेटे परिधान केलेल्या महिलांनी शिस्तबद्ध पद्धतीने रॅली काढल्याने शहरात या वाहन रॅलीचे कौतुकही करण्यात आले. तसेच ठिकठिकाणी स्वागत ही करण्यात आले.

## रांजणगाव शेंणपुंजी येथे जागतिक महिला दिनानिमित्त विशेष मार्गदर्शन तसेच स्वच्छता कामगार महिलांचा सत्कार

**दिनेश परदेशी**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जागतिक महिला दिनानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चा, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांच्या वतीने भव्य दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्रमुख पाहुण्याच्या हस्ते दीपप्रज्वलीत करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये महिलांसाठी विशेष मार्गदर्शन तसेच स्वच्छता कामगार महिलांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन मोहिनी दीपक बडे यांनी केले असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून महिला व बालविकास अध्यक्ष ॲड. आशा शेरखाने उपस्थित राहणार आहेत. तसेच अभिनेता अमोल जांदे, भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते आणि महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष जयमालाताई वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.

याशिवाय मीनाताई पनाड, संजीवनी सदावर्ते, कविता खिवळे, उषाताई खिवळे, कांताबाई जाधव, योगिता महालकर, कल्पना जाधव, नंदाबाई बडे, निर्मला पठाडे, नंदिनी लोखंडे, सोनुताई लोखंडे आणि सायबाबा सख्यद यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात महिलांना विविध क्षेत्रातील मार्गदर्शन देण्यात येणार असून समाजातील स्वच्छता कामगार महिलांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### तिच्या प्रत्येक भूमिकेचा आपण आदर करायला हवा

"आजचा दिवस जितका महिलांसाठी खास आहे, तितकाच तो संपूर्ण मानव समाजासाठीही खास आहे. कारण स्त्री एक मार्गदर्शक आहे. समर्थक आहे. प्रेरणादायी व्यक्ती आहे. ती आपल्या आयुष्यात कधी आई म्हणून, कधी बहीण म्हणून, कधी मैत्रीण म्हणून, तर कधी जीवनसाथी म्हणून असते. तिच्या प्रत्येक भूमिकेचा आपण आदर करायला हवा. त्यामुळे आपण आपल्या आयुष्यात असणाऱ्या प्रत्येक स्त्रीचे आभार मानले पाहिजेत, कारण त्या नसत्या तर आपले जीवन अपूर्ण राहिले असते.

**– मोहिनी दीपक बडे**

# वृक्ष म्हणजे महत्त्वाची शहरी पायाभूत सुविधा

शहरांच्या झपाट्याने होणाऱ्या विकासाच्या शर्यतीत शहरी वृक्षसंपत्तीचे महत्त्व वारंवार दुर्लक्षित केले जात आहे. प्रत्यक्षात झाडे ही केवळ सौंदर्य नव्हे, तर पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेची अत्यावश्यक पायाभूत सुविधा आहेत.

असा एकही पावसाळा जात नाही ज्यावेळेस आपल्याला दिसते की झाड गाडीवर कोसळते आणि झाडे पडून मानवी मृत्यू देखील होतात. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. रस्त्यालगतच्या झाडांमुळे पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या काँक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघून जातो – परत उंच, रुंद, वेगाने विकास कामे उभारायला. विशेष म्हणजे याच प्रक्रियेत आपण त्याच–त्याच चुका वारंवार करत राहतो. झाडांकडे फक्त शोभेची वस्तू किंवा अडथळा म्हणून बघतो. मुख्य म्हणजे वृक्ष म्हणजे महत्त्वाची शहरी पायाभूत सुविधा आहे हे विसरतो.

भारत ऐतिहासिकदृष्ट्या अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. २०४७ पर्यंत आपल्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळूरु, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर झपाट्याने कायापालट होत आहेत. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाची एक किंमत असते जी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही. आपल्या शहरी वृक्षसंपत्तीची किंमत, हे संवर्धनाचे म्हणणे नाही. हे पायाभूत सुविधांचे म्हणणे आहे आणि भारतातील शहर नियोजनकार अभियंते, महानगरपालिका अधिकारी आणि धोरणकर्त्यांनी हे स्पष्टपणे ऐकण्याची वेळ कधीच उलटून गेली आहे. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत. योग्य व्यवस्थापन केल्यास ती स्वतःच 'विकास' आहेत का महत्त्वाचा मूलमंत्र आहे.

मी आर्बोरिस्ट आहे, असे सांगितले की अनेकदा समोरच्याचा प्रतिसाद फक्त विनम्रपणे मन डोलवण्यापुरता असतो आणि समज असतो की मी एखाद्या रोपवाटिकेत काम करतो किंवा विकेंडला कुंपण छाटतो. प्रत्यक्षात हे काम त्यापेक्षा कितीतरी अधिक तांत्रिक आणि कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे. आर्बोरिकल्चर म्हणजे शहरी वातावरणातील वैयक्तिक झाडांचे व्यवस्थापन करण्याचे शास्त्र आणि कला. यात संरचनात्मक धोक्याचे मूल्यांकन, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वृक्ष–प्रभाव मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे व्यवस्थापन, बांधकामाच्या काळात झाडाचे छत्र जपणे, झाडांच्या आरोग्याचे निदान आणि झाड तोडणे व टिकवून ठेवणे यांशी संबंधित कायदेशीर व पर्यावरणीय चौकट यांचा समावेश होतो. हे प्रत्येक अर्थाने शहरी पायाभूत सुविधा व्यवस्थापनाचे एक शास्त्र आहे, जे भारताच्या मुख्य प्रवाहातील नियोजनातून जवळपास पूर्णपणे गायब आहे. एका प्रौढ झाडाचा शहरासाठी विचार करा. ते कार्बन शोषून घेते. बाष्पोत्सर्जनाने सभोवतालचे तापमान दोन ते चार अंशांनी कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरवते. हवेची गुणवत्ता सुधारते, ध्वनिप्रदूषण कमी होते, जैवविविधता टिकते आणि मानसिक स्वास्थ्य, मालमत्तेचे मूल्य आणि सामुदायिक एकात्मता यांवर त्याचे सिद्ध परिणाम होतात. हे हजारो झाडांच्या शहरी जंगलात गुणाकार करा. आर्थिक मूल्य थक्क करणारे आहे आणि ते गमावल्यावरची किंमतही तितकीच मोठी आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. या शहरांमध्ये आर्बोरिकल्चरसाठी सर्वात मोठे आव्हान दिसते. कारण हे शहर असाधारण नैसर्गिक वारसा असलेले आहे – जुने वटवृक्ष जे संपूर्ण चौकांवर छत्र धरतात, किनारपट्टीचे रक्षण करणारी खारफुटीची जंगले, पिढ्यानपिढ्या शहराचे प्रदूषण आणि वेदना शांतपणे सहन करणारी झाडे आणि त्याच वेळी हे एक अखंड पायाभूत दबावाखाली असलेले शहर आहे. गेल्या दशकात एकट्या मुंबईत मेट्रो, किनारी रस्ता आणि महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे तोडण्यात आली किंवा कायमची बाधित झाली. यातील काही तोडणे अपरिहार्य होते. अनेक नव्हती. यातील फरक – झाड वाचवणे आणि झाड तोडणे – हा बऱ्याचदा एवढाच असतो की नियोजनाच्या टप्प्यात प्रशिक्षित आर्बोरिस्ट त्या निर्णय प्रक्रियेत होता का? सुरक्षिततेचा आयाम तर आणखीच महत्त्वाचा आहे. मुंबईच्या गर्दीच्या रस्त्यांवर मुळांवर दबाव, चुकीच्या पद्धतीने छाटणी आणि बांधकामाच्या नुकसानीमुळे झाडे धोकादायक बनतात. संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेले झाड अप्रशिक्षित डोळ्यांना वर्षानुवर्षे हिरवेगार आणि निरोगी दिसू शकते आणि एक दिवस अचानक कोसळते. प्रमाणित आर्बोरिस्टकडून जोखीम मूल्यांकन हे ऐषोआरामाची गोष्ट नाही ती सार्वजनिक सुरक्षा आहे.

जागरूकता आणि शिक्षण आवश्यक आहे पण पुरेसे नाही. भारतीय शहरांचा झाडांशी असलेला संबंध बदलण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप हवा, आणि तो तातडीने हवा. रोपटे लावणे म्हणजे प्रौढ झाड जतन करणे नव्हे. शंभर रोपटी एका ८०–वर्षांच्या वटवृक्षाची जागा घेत नाहीत. हा फरक धोरणात रुजवायला हवा. कॉर्पोरेट भारतालाही यात भूमिका आहे. खऱ्या अर्थाने सार्थक ईएसजी बांधिलकीमध्ये प्रकल्प स्थळांवर आर्बोरिकल्चरल कसोशीचा समावेश होतो. टिकाऊपणाबद्दल गंभीर असलेल्या कंपन्यांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी व्यावसायिक वृक्ष–प्रभाव मूल्यांकन करवून घ्यायला हवे. काम झाल्यावर गच्चीवर रोपटे लावणे हे ग्रीनवॉशिंग आहे.

अनावश्यक तोडण्यात येणारी झाडे, चुकीच्या छाटणीने खालावणारे छत्र, अज्ञानी बांधकाम प्रथांमुळे मरणारे वारसा वृक्ष आणि अधिकाधिक गरम, गोंगाटमय आणि श्वास घेणे कठीण होत जाणारी शहरांची सध्याची परिस्थिती आहे.

# मनी लॉन्ड्रिंग : आर्थिक व्यवस्थेसमोरील गंभीर आव्हान

अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका वृत्तानुसार २४६७ कोटी रुपयांच्या कथित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अर्चना कुटे यांच्यावर तपास यंत्रणांनी मोठी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील बातमी एका नामवंत वृत्तपत्रात प्रकाशित झाली असून या प्रकरणामुळे आर्थिक गुन्हे आणि मनी लॉन्ड्रिंग या विषयांवर पुन्हा एकदा व्यापक चर्चा सुरू झाली आहे. या घटनेकडे केवळ एका व्यक्तीविरुद्ध झालेली कारवाई म्हणून न पाहता, देशाच्या आर्थिक व्यवस्थेसमोरील एक गंभीर प्रणालीगत समस्या म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे.

मनी लॉन्ड्रिंग म्हणजे बेकायदेशीर मार्गाने मिळवलेल्या पैशाला विविध आर्थिक व्यवहारांच्या माध्यमातून कायदेशीर स्वरूप देण्याची प्रक्रिया होय. या प्रक्रियेमध्ये काळा पैसा आर्थिक व्यवस्थेत मिसळला जातो आणि त्याचा मूळ स्रोत लपवला जातो. सामान्यतः मनी लॉन्ड्रिंग तीन टप्प्यांत केली जाते. –Placement, Layering आणि Integration. प्रथम टप्प्यात बेकायदेशीर पैसा बँकिंग किंवा आर्थिक व्यवस्थेत आणला जातो. दुसऱ्या टप्प्यात विविध व्यवहारांद्वारे त्या पैशाचा स्त्रोत लपवण्याचा प्रयत्न केला जातो. तिसऱ्या टप्प्यात तो पैसा वैध गुंतवणूक, व्यवसाय किंवा मालमत्ता खरेदीच्या स्वरूपात दाखवला जातो. त्यामुळे तो पैसा पूर्णपणे कायदेशीर असल्यासारखा दिसू लागतो.

आर्थिक तज्ञांच्या मते अशा प्रकरणांमध्ये अनेकदा शेल कंपन्या, बनावट व्यवहार, खोटी गुंतवणूक किंवा गुंतागुंतीची आर्थिक रचना तयार केली जाते. या प्रक्रियेमुळे पैशाचा खरा स्रोत शोधणे अत्यंत कठीण होते. म्हणूनच तपास यंत्रणांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहारांचे विश्लेषण करावे लागते. भारतामध्ये मनी लॉन्ड्रिंगविरोधी कारवाईसाठी Prevention of Money Laundering Act (PMLA), 2002 हा कायदा लागू आहे. या कायद्याअंतर्गत सक्तवसुली संचालनालय (ED), आयकर विभाग तसेच इतर वित्तीय तपास यंत्रणा आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करतात. बँकिंग प्रणालीमध्ये मोठ्या व्यवहारांवर विशेष लक्ष ठेवले जाते आणि संशयास्पद व्यवहारांची माहिती संबंधित यंत्रणांना दिली जाते.

मनी लॉन्ड्रिंगचा परिणाम केवळ एखाद्या आर्थिक व्यवहारापुरता मर्यादित नसतो. त्याचा थेट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. जेव्हा बेकायदेशीर पैसा आर्थिक व्यवस्थेत प्रवेश करतो तेव्हा कर महसूल कमी होतो, आर्थिक असमानता वाढते आणि आर्थिक शिस्त ढासळते. प्रामाणिक व्यवसाय करणाऱ्या उद्योगांना अशा परिस्थितीत स्पर्धेत अडचणी निर्माण होतात. यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वासही कमी होऊ शकतो. सामाजिक पातळीवर देखील अशा आर्थिक गुन्ह्यांचे परिणाम गंभीर असतात. भ्रष्टाचाराला चालना मिळते, आर्थिक प्रामाणिकतेचा अभाव निर्माण होतो आणि आर्थिक व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास कमी होण्याची शक्यता वाढते.

मनी लॉन्ड्रिंग ओळखण्यासाठी काही व्यवहारिक संकेत लक्षात घेणे आवश्यक असते. उदाहरणार्थ उत्पन्नाच्या तुलनेत असामान्य मोठे आर्थिक व्यवहार, अल्प कालावधीत अनेक खात्यांमधून पैशांची सतत हालचाल, स्पष्ट व्यवसायिक कारण नसताना मोठ्या गुंतवणुका, शेल कंपन्यांच्या माध्यमातून व्यवहार किंवा रोख रकमेचा अतिवापर हे सर्व संशयास्पद संकेत मानले जातात. तसेच परदेशी खात्यांमधील वारंवार आर्थिक व्यवहार देखील तपासाचा विषय ठरू शकतात. आर्थिक संस्थांनी आणि नियामकांनी अशा व्यवहारांवर सतत लक्ष ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते. आजच्या डिजिटल युगात आर्थिक व्यवहारांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. ऑनलाइन व्यवहार, डिजिटल पेमेंट प्रणाली आणि जागतिक आर्थिक नेटवर्क यामुळे पैशाची हालचाल अत्यंत वेगाने होत आहे. त्यामुळे तपास यंत्रणांनीही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे आवश्यक आहे. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित आर्थिक विश्लेषण प्रणाली वापरल्यास मोठ्या प्रमाणातील व्यवहारांचे विश्लेषण करणे सुलभ होऊ शकते. व्यवहारांचा पॅटर्न, निधीचा प्रवाह आणि खात्यांमधील परस्पर संबंध यांचे विश्लेषण करून संशयास्पद व्यवहार लवकर ओळखता येऊ शकतात. भविष्यात आर्थिक गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अशा तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करणे अत्यंत आवश्यक ठरणार आहे.

या पार्श्वभूमीवर आर्थिक पारदर्शकता आणि वित्तीय शिस्त वाढवणे ही काळाची गरज आहे. कंपन्यांचे आर्थिक व्यवहार, बँकिंग प्रणालीतील व्यवहार आणि मोठ्या आर्थिक गुंतवणुकींवर प्रभावी नियंत्रण ठेवले गेले तर अशा गुन्ह्यांना आळा घालणे शक्य होईल. आर्थिक शिक्षण आणि जागरूकता वाढवणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. कारण आर्थिक गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर आर्थिक व्यवस्थेमध्ये प्रामाणिकता आणि उत्तरदायित्वाची संस्कृती निर्माण होणे आवश्यक असते.

शेवटी असे म्हणता येईल की मनी लॉन्ड्रिंगसारख्या आर्थिक गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी कडक कायदे, सक्षम तपास यंत्रणा, तंत्रज्ञानाचा वापर आणि पारदर्शक आर्थिक व्यवस्था हे सर्व घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. आर्थिक प्रामाणिकता आणि उत्तरदायित्व यांची जपणूक झाली तरच देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनू शकते.

**– डॉ. भारत कऱ्हाड**
(चार्टर्ड अकाउंटंट, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक विश्लेषक)

# मंत्री अतुल सावे यांच्या वाढदिवसानिमित्त इंदुरीकर महाराजांचे प्रबोधनात्मक कीर्तन




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्याचे मंत्री अीींश्र डरींश यांच्या वाढदिवसानिमित्त एन–सेवन परिसरातील रामलीला मैदानावर प्रसिद्ध कीर्तनकार यांचे प्रबोधनपर कीर्तन मोठ्या उत्साहात पार पडले. या कीर्तनाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते बबन डिडोरे पाटील यांच्या वतीने करण्यात आले होते.

कीर्तनादरम्यान महाराजांनी समाजप्रबोधन करताना मराठी शाळांचे महत्त्व अधोरेखित केले. मंत्री सावे तसेच इतर लोकप्रतिनिधींनी मराठी शाळा टिकून राहाव्यात यासाठी विशेष प्रयत्न करावेत, शासनाकडून आवश्यक ती मदत मिळवून देऊन मराठी माध्यमातील शिक्षण कसे टिकवता येईल यावर उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी शाळा टिकल्या तरच येणारी पिढी सुसंस्कृत घडेल, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळांमुळे अनेक पालकांवर आर्थिक ताण येत असून पालकांची कंबर मोडली जात असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. या विषयावर त्यांनी विविध उदाहरणांद्वारे उपस्थितांना प्रबोधन केले. या कीर्तनासाठी एन–सेवन परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल नागरिकांनी बबन डिडोरे पाटील यांचे आभार व्यक्त केले.

# भारतीय संघाच्या विजयानंतर पंतप्रधान मोदींकडून अभिनंदनाचा वर्षाव

**मुंबई :** भारतीय क्रिकेट संघानं २०२६ च्या आयसीसी पुरुष टी–२०विश्वचषक स्पर्धेत शानदार कामगिरी केली. अहमदाबाद इथं झालेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियानं न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करुन तिसऱ्यांदा टी–२० विश्वचषक जिंकला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विजयाबद्दल टीम इंडियाचं अभिनंदन केलं. यासह टीम इंडियावर सर्व स्तरावरुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्स हँडलवरुन पोस्ट केलं, 'आयसीसी पुरुष टी–२० विश्वचषक जिंकल्याबद्दल भारतीय संघाचं हार्दिक अभिनंदन! हा शानदार विजय असाधारण कौशल्य, दृढनिश्चय आणि टीमवर्कचा दाखला आहे. त्यांनी संपूर्ण स्पर्धेत असाधारणपणे चांगली कामगिरी केली. या विजयानं प्रत्येक भारतीयाचं हृदय अभिमानानं आणि आनंदानं भरुन गेलं आहे. शाबास, टीम इंडिया!'

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लिहिलं, 'काय विजय! विश्वविजेत्या टीम इंडियाला सलाम. संपूर्ण स्पर्धेत तुमच्या चमकदार कामगिरीनं आणि प्रचंड उत्साहानं देशाला अभिमान आणि सन्मान मिळवून दिला आहे. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटल्याबद्दल संपूर्ण टीमचं अभिनंदन.'

# अंधाराशी झुंजणाऱ्या 'विद्युलता' : विद्युत क्षेत्रातील स्त्रीशक्तीचा तेजस्वी प्रवास

आजचे जग हे प्रगती, तंत्रज्ञान आणि वेगवान विकासाचे युग आहे. एकेकाळी मानवाच्या मूलभूत गरजांमध्ये अन्न, वस्त्र आणि निवारा यांचा समावेश होता; परंतु आजच्या आधुनिक जीवनात वीज ही चौथी अत्यावश्यक गरज बनली आहे. घरातील दिव्यापासून ते रुग्णालयातील जीवनरक्षक ऑपरेशन थिएटरपर्यंत, शेतातील पाणी उपसणाऱ्या पंपापासून ते उद्योगधंद्यांच्या चाकांपर्यंत प्रत्येक ठिकाणी विजेचे अस्तित्व अपरिहार्य आहे. या विजेच्या अखंड आणि सुरळीत पुरवठ्यावरच आजच्या समाजाचा विकास आणि दैनंदिन जीवन अवलंबून आहे.



परंतु हा प्रकाश टिकवून ठेवण्यासाठी पडद्यामागे अनेक अदृश्य हात अहोरात्र झटत असतात. विद्युत क्षेत्रातील अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी रात्रंदिवस सतर्क राहून आपले कर्तव्य पार पाडत असतात. विशेषतः या क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचे योगदान आज अधिक उल्लेखनीय ठरत आहे. एकेकाळी पुरुषांची मक्तेदारी मानल्या जाणाऱ्या या तांत्रिक क्षेत्रात आज महिलांनी केवळ प्रवेशच केला नाही, तर आपल्या कर्तृत्वाने आणि धैर्याने उंच भरारी घेतली आहे.

विद्युत क्षेत्र हे अत्यंत जोखमीचे आणि आव्हानात्मक क्षेत्र आहे. येथे अनेकदा 'लाईव्ह लाईन'वर काम करावे लागते, जिथे एका क्षणाची चूकही जीवावर बेतू शकते. उपकेंद्रातील काम असो, टॉवर लाईनची तपासणी असो किंवा अचानक उद्भवलेल्या तांत्रिक बिघाडाचे निराकरण असो प्रत्येक कामामध्ये धैर्य, कौशल्य आणि अत्यंत सतर्कतेची गरज असते. अशा परिस्थितीतही अनेक महिला अभियंते आणि विद्युत कर्मचारी तळहातावर शिर घेऊन कर्तव्य बजावत असतात.

इमर्जन्सी ड्युटीला येथे वेळेचे कोणतेही बंधन नसते. मध्यरात्री फोन आला तरी कामासाठी सज्ज व्हावे लागते; वादळी पाऊस, अंधारी रात्र किंवा प्रखर उन्हाळा परिस्थिती कोणतीही असो, वीजपुरवठा सुरळीत राहावा यासाठी या महिला सतत जागरूक असतात. समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी त्या अनेकदा स्वतःच्या सुरक्षिततेकडेही दुर्लक्ष करून काम करतात.

विशेष म्हणजे, समाजातील प्रत्येक घर उजळून निघावे म्हणून काम करणाऱ्या या स्त्रियांना अनेकदा स्वतःच्या आयुष्यातील आनंदाचे क्षण त्यागावे लागतात. दिवाळी, दसरा, गणेशोत्सव किंवा इतर सण-उत्सव असताना बहुतेक लोक आपल्या कुटुंबासोबत आनंदाने वेळ घालवत असतात; परंतु विद्युत क्षेत्रातील महिला कर्मचारी मात्र उपकेंद्रात 'हाय अलर्ट'वर बसून वीजपुरवठा सुरळीत राहावा यासाठी सतर्क असतात. प्रत्येक घरात दिवा पेटावा, सणासुदीच्या आनंदात अंधाराचा अडथळा येऊ नये, यासाठी त्या स्वतःच्या कुटुंबापासून दूर राहून कर्तव्य पार पाडतात. त्यांचे हे मौन बलिदान समाजाच्या नजरेत क्वचितच येते. पावसाळ्यात जेव्हा वादळी वारे, मुसळधार पाऊस आणि नैसर्गिक अडचणींमुळे वीजपुरवठा खंडित होतो, तेव्हा लोकांची नाराजी व्यक्त होते.

सोशल मीडियावर किंवा वर्तमानपत्रांमध्ये पाऊस आला की लाईट गेली. अशा आशयाच्या बातम्याही झळकतात. परंतु त्याच वेळी पावसात भिजत, ओल्या खांबावर किंवा उंच टॉवरवर चढून विजेच्या तारा दुरुस्त करणारे विद्युत कर्मचारी मात्र कोणालाच दिसत नाहीत. गुडघाभर पाण्यात उभे राहून, जीवाची पर्वा न करता वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी झटणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे कष्ट समाजापर्यंत क्वचितच पोहोचतात. आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण पाहतो की स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. इतिहासात सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई आणि जिजाऊ यांसारख्या महान स्त्रियांनी समाजाला दिशा दिली आणि स्त्रीशक्तीचा अद्वितीय आदर्श निर्माण केला. त्यांच्या प्रेरणेने आजची स्त्री राष्ट्रपती पदापासून ते अंतराळापर्यंत पोहोचली आहे. खेळ, विज्ञान, प्रशासन, तंत्रज्ञान प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपले स्थान निर्माण केले आहे.

त्याचप्रमाणे विद्युत क्षेत्रात काम करणाऱ्या आम्हा महिला अभियंत्यांनाही जेव्हा उपकेंद्रांना जोडणाऱ्या व दूरवर पसरलेले टॉवर लाईनचे विस्तीर्ण जाळे दिसते, तेव्हा आमचे मन अभिमानाने भरून येते. कारण त्या जाळ्याद्वारे हजारो घरांमध्ये प्रकाश पोहोचतो, उद्योगधंद्यांना ऊर्जा मिळते आणि देशाच्या प्रगतीला गती मिळते. या विकासाच्या प्रवासात आपलाही एक छोटासा खारीचा पण महत्त्वाचा वाटा आहे, ही भावना आम्हाला अधिक प्रेरणा देते.

खरं तर विद्युत क्षेत्रात काम करणाऱ्या या सर्व महिला म्हणजे अतिउच्च दाबात कार्य करणाऱ्या खऱ्या अर्थाने 'विद्युलता' आहेत. त्या केवळ कर्मचारी नाहीत, तर समाजाला प्रकाश देणाऱ्या विजेच्या खऱ्या दूत आहेत. अंधाराशी लढत, संकटांना सामोरे जात, त्या समाजाच्या जीवनात प्रकाशाचा दीप प्रज्वलित ठेवतात. विद्युत क्षेत्रातील आव्हानांना आपल्या जिद्दीने पेलणाऱ्या आणि जनजीवन अखंडितपणे प्रवाही ठेवणाऱ्या प्रत्येक शक्ती' रूपाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. केवळ घराघरातील दिवेच नव्हे, तर आपल्या कतृत्वाने प्रगतीचे मार्ग उजळणाऱ्या सर्व महिला विद्युत योद्धयांना जागतिक महिला दिनानिमित्त माझा मानाचा मुजरा!'

संकटांच्या वादळातही
ती दीपस्तंभ बनते,
लाईव्ह लाईनवर
धैर्याने कर्तव्य निभावते।
स्वतःच्या आनंदाचा
त्याग करून उजेड वाटते,
विद्युत क्षेत्रातील ही नारी - देशाची
विद्युलता ठरत

**- सीमा गाडेकर**
उपकार्यकारी अभियंता महापारेषण
छत्रपती संभाजीनगर...

# महिलांचे खरे सौंदर्य तिच्या सामर्थ्यातच : ज्योती गायकवाड

**महिला** सक्षमीकरण हा आजच्या समाजातील अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. महिलांना समाजात बळकट स्थान देणे, त्यांचे अधिकार जपणे आणि त्यांना स्वावलंबी बनवणे हे आपल्या समाजाचे कर्तव्य आहे.



**सक्षमीकरण म्हणजे काय?**

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना समाजात बरोबरीचा दर्जा देणे, त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे, आणि त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे. हे केल्याने महिलांना आत्मविश्वास वाढतो आणि समाजाचा सर्वांगीण विकास होतो.

**- महिला सक्षमीकरणाचे फायदे -**

- **समाजात संतुलन:** महिला आणि पुरुष दोघेही बरोबरीने काम करत असतील तर समाजात संतुलन राहते.
- **आर्थिक विकास:** महिलांचे शिक्षण आणि रोजगार वाढल्याने देशाचा आर्थिक विकास होतो.
- **स्वास्थ्य आणि पोषण:** शिक्षित महिलांमुळे परिवाराचे स्वास्थ्य आणि पोषण सुधारते.
- **बालविवाह कमी :** शिक्षित महिलांना बालविवाहाच्या विरोधात जागरूकता निर्माण करता येते.

महिला सक्षमीकरणासाठी काही महत्त्वाचे कदम:महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी मिळाली पाहिजे, त्यांच्यावरील सातत्याने होणारे अत्याचार थांबले पाहिजे, त्यांना उद्योग क्षेत्रात करिअर उभा राहिला पाहिजे ,विविध शासकीय योजनेत महिलांना समान संधी उपलब्ध झाली पाहिजे, त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला पाहिजे, त्यांच्या उत्पादित वस्तुंना मोठीं बाजारपेठ उपलब्ध झाली पाहिजे त्यांचा दबावगट तयार करून स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकार व इतर विविध ठिकाणी आपला कार्याचा ठसा उमटला पाहिजे, यासाठी त्यांचे हक्काचे व्यासपीठ म्हणून २९ ऑक्टोंबर २००४ ला संभाजीनगर औरंगाबादमध्ये ग्रामस्वराज्य महीला महासंघाची स्थापना झाली त्यातून महिला सक्षमीकरणाला बळ देणारी ज्योत पेटली आणि संभाजीनगर जिल्ह्यातील वाळूज गावातून श्री अविनाश गायकवाड आणि मी त्यांची पत्नी सौ ज्योतीताई गायकवाड आम्ही खरी मुहूर्तमेळ रोवली आणि एका विशिष्ट ध्येयाने प्रेरीत होऊन सुरू झालेल्या या चळवळीने संपूर्ण विभागच नव्हे तर महाराष्ट्रात झंझावात निर्माण झाला सांगताना अभिमान वाटतो. अलीकडील काळात शासकीय स्तरावर महिलांना सक्षम करण्यासाठी विविध प्रकारच्या योजना तयार झाल्या, स्थानिक स्वराज्य संस्था मध्येही पन्नास टक्के आरक्षण आज महिलांना आपले कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी वाव मिळाला आहे.

- **शासनाच्या विविध योजना :** मुलगी जन्मली तिच्या आरोग्य, पोषण, प्रार्थमिक शिक्षण, पासून ते परदेशातील उच्च शिक्षनापर्यंत, एसटी बस मध्ये ५० टक्के आरक्षण पासून ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ५० टक्के आरक्षण पर्यंत पर्यायाने विधानसभा लोकसभा च्या ३३टक्के आता स्त्री पुरूष प्रधान संस्कृती झुगारून खांद्याला खांदा लावून उज्वल जीवन साकारताना दिसताहेत.
- **शिक्षण :** सर्व स्त्री-पुरुषांना शिक्षणाचा समान हक्क मिळायला हवा.
- **रोजगार :** महिलांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी मिळायला हव्यात.या सर्व बाबी आता गौण ठरताना दिसत आहेत
- **सामाजिक जागरूकता :** समाजात महिला सक्षमीकरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.
- **कायदेशीर उपाय :** महिलांच्या हक्कांचे रक्षण करणारे कायदे कडकपणे लागू व्हायला हवेत.आजही अनेक अन्याय अत्याचाराच्या घटना घडत आहेतत्याला आळा घालण्यासाठी, उद्धयोग, सहकार, आणि शाश्वत विकास साध्य करण्यासाठी तिला मुख्यप्रवाहात आणण्यासाठी समाजातील प्रत्येक स्त्रीला सक्षमी बनवणे हे आपले कर्तव्य आहे. चला, महिला सक्षमीकरणासाठी एकत्रितपणे काम करूया! महिला सक्षमीकरण हेच आमचे मिशन ! जय स्त्री शक्ती

**-सौ. ज्योती अविनाश गायकवाड**
मु.पो.वाळूज ता. गंगापूर जिल्हा
छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र ४३००३३

# संघर्ष भालेराव फाउंडेशनच्या कार्यालयाचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

संघर्ष भालेराव फाउंडेशनच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन माननीय पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले उद्घाटन प्रसंगी बोलताना संघर्ष भालेराव म्हणाले की या कार्यालयातून महिलांचे उद्योग संबंधित आर्थिक परिस्थिती संबंधित प्रश्न सोडवले जातील.

बचत गटाच्या मार्फत महिलांना सक्षम करणे जेणेकरून महिला आपल्या स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या पाहिजेत व उद्योगात भरारी घेतली पाहिजे हा उद्देश समोर ठेवून संघर्ष भालेराव फाउंडेशन नेहमीच काम करते. बचत गटाच्या माध्यमातूनच महिलांना स्वयंरोजगार मिळवून देण्याचे काम या फाउंडेशन तर्फे करण्यात येते यात संघर्ष भालेराव फाउंडेशन चे जवळपास ३० ते ३५ जणांची टीम या कार्यात सहभागी होते महिलांना शिलाई मशीन आटा चक्की शेळीपालन पशुपालन यातून दुधाचा व्यवसाय ज्या महिलांना करता येतो आपल्या आर्थिक परिस्थिती सुधारता येते असे संघर्ष भालेराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितले.



# जागतिक महिला दिन जिथे स्त्रीचा सन्मान होतो, तिथेच खऱ्या अर्थाने राष्ट्राचा विकास होतो! - रचना पहाडे जैन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

आजची स्त्री ही घरापुरती मर्यादित नसून अंतराळापासून ते उद्योगजगतापर्यंत प्रत्येक क्षेत्रात आपली छाप उमटवत आहे. महिलांच्या या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो. स्त्रियांच्या स्वातंत्र्य, हक्कांसाठी आणि समानतेसाठी केलेल्या लढ्यांच्या स्मरणार्थ हा दिवस जागतिक स्तरावर साजरा केला जातो. आजच्या युगात स्त्रिया फक्त घरापुरत्याच मर्यादित नसून शिक्षण, विज्ञान, राजकारण, क्रीडा, उद्योग अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत आणि आपल्या अस्तित्वाची जाणीव जगाला करून देत आहेत. परंतु आजही अनेक ठिकाणी महिलांना समान संधी मिळत नाहीत. हिंसा आणि अत्याचारासारख्या समस्या समोर येत आहेत. आपल्याला खरे समतोल समाज घडवायचा असेल तर मुलगा-मुलगी भेदभाव न करता महिलांना योग्य सन्मान देणे गरजेचे आहे.



तिथेच खऱ्या अर्थाने स्त्रीचा विकास होईल. नव निर्मितीची संकल्पना घेऊ या, रचना नवं कलाकृती करू या. एक दिवस तरी स्त्रीच्या अस्तित्वासाठी साजरा करू या... अशी माहिती समाजसेविका रचना पहाडे जैन यानी दिली.

# मालक-संपादक महासंघातर्फे सुभेदारी गेस्ट हाऊस येथे इफ्तार पार्टी उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

पवित्र रमजान महिन्यानिमित्त मालक - संपादक महासंघाच्या वतीने गुरुवारी (दिनांक ५ मार्च) रोजी सायंकाळी सुभेदारी गेस्ट हाऊस येथे ईफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात पत्रकार, संपादक, शासकीय अधिकारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निमित्ताने उपस्थितांनी एकमेकांना रमजानच्या शुभेच्छा देत सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि ऐक्याचा संदेश दिला.

या कार्यक्रमाला जिल्हा माहिती अधिकारी मिलिंद दुसाने, सहाय्यक संचालक श्री. गणेश फुंदे, श्री. भानेगावकर, महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच औरंगाबाद टाइम्सचे संपादक शकीब खुसरो, महानगरपालिका जनसंपर्क विभागाचे वरिष्ठ लिपिक रवी खरात, करण भाऊ, जिल्हा माहिती कार्यालयाचे सतीश वाबळे, श्री. ल ोखंडे, शासन सम्राटचे संपादक किशोर महाजन, मराठवाडा पोलीस टाईम्सचे वाय. के. नारायणपूरकर, दैनिक मुकद्दसचे सईद शेख, जनराहतचे संपादक अब्दुल गणी, दैनिक रहेबरचे संपादक शेख मजहर, दैनिक अलजजीराचे संपादक जकी सज्जाद अहमद, औरंगाबाद समाचारचे सय्यद मोईन, शाहकार प्रभातचे संपादक सय्यद रफिक, औरंगाबाद दर्शनचे संपादक सुरेश क्षिरसागर, दैनिक आज की आवाजचे संपादक इमरान बाशवान, दैनिक लोकसंग्रहचे मोहसीन खान, वाहेद कल ामचे वाहेद फारुकी, दैनिक जनभाग्यचे संपादक अरबाज खान, शेख अनवर खातीब, मोहम्मद अक्रम, शेख अवेज आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय प्रशांत राऊत (संचालक कार्यालय) तसेच साप्ताहिक सिटी टुडेचे संपादक शेख जब्बार यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून रमजान महिन्याच्या शुभेच्छा दिल्या.ईफ्तार पार्टीच्या माध्यमातून पत्रकारिता क्षेत्रातील सहकारी एकत्र आले असून आपापसातील संवाद, मैत्री आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ होण्यास मदत झाली. कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत आपुल कीचे व उत्साहपूर्ण होते. उपस्थित मान्यवरांनी रमजान महिन्याचे महत्त्व सांगत समाजात शांतता, सहिष्णुता आणि बंधुभाव कायम ठेवण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकत्र येऊन ईफ्तार घेतला व परस्परांना शुभेच्छा देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. रमजानच्या पवित्र महिन्यात आयोजित या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# पोलीस उपअधीक्षक साईनाथ ठोंबरे यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर येथे अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्समध्ये पोलीस उपअधीक्षक म्हणून नुकतेच रुजू झालेल्या श्री. साईनाथ ठोंबरे यांचा श्री श्याम समिती छत्रपती संभाजीनगर तसेच अखिल भारतीय अग्रवाल संमेलन यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

श्री. साईनाथ ठोंबरे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. अमली पदार्थ विरोधी मोहिमेत त्यांची नियुक्ती झाल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. समाजातील तरुणांमध्ये वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या व्यसनाविरुद्ध प्रभावी कारवाई करण्यासाठी ठोंबरे यांच्या कार्यातून सकारात्म क बदल घडतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी श्री. साईनाथ ठोंबरे यांनी लोणावळा येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित टाटा अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेऊन ती यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. कठोर परिश्रम, शिस्त आणि फिटनेसच्या जोरावर त्यांनी ही मॅरेथॉन पूर्ण केली असून यामुळे अनेक तरुणांसाठी ते प्रेरणादायी ठरत असल्याचे दिपक अग्रवाल यांनी सांगितले. वाळूज येथील वैष्णोदेवी मंदिराचे दीपक गर्ग यांनी श्री. साईनाथ ठोंबरे यांच्या कार्यतत्परतेचे, कर्तृत्वाचे तसेच सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. त्यांनी समाजाच्या सुरक्षिततेसाठी तसेच अमली पदार्थांविरुद्ध लढ्यात प्रभावीपणे काम करून समाजाला दिशा देण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. या प्रसंगी अखिल भारतीय अग्रवाल संमेलनचे अध्यक्ष अमूल अग्रवाल, सचिव सचिन अग्रवाल, दीपक जैन तसेच श्री श्याम समितीचे मनोज अग्रवाल, कमलेश अग्रवाल, हरीश रोहाटीया, गिरीश मिमरोट अन्य सदस्य उपस्थित होते.

## सोनाबाई तोमर यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर येथील धावणी मोहल्ला, सराफा रोड परिसरातील रहिवासी सोनाबाई बहादुरसिंह तोमर (वय ९५) यांचे ५ मार्च २०२६ दुपारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. दुपारी ३.३० वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात कुटुंबीय व आप्तेष्ट नातू पणतू मुले सुना असा मोठा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा उद्या शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ रोजी सकाळी त्यांच्या धावणी मोहल्ला, सराफा रोड येथील राहत्या घरातून निघून कैलाश नगर स्मशानभूमी, छत्रपती संभाजीनगर येथे सकाळी १०.०० वाजता त्यांच्या अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. एस.बी. राजपूत व मुकुंद सिंग राजपूत यांच्या त्या मातोश्री होत

# श्वास थांबला पण अखेरपर्यंत जपला निष्ठेचा ठेवा

**वैजापूर (अट्टल मत प्रतिनिधी)**

वैजापूर कोपरगाव तालुक्याच्या सीमेवरील खोपडी (ता. कोपरगाव) येथील ज्येष्ठ नागरिक तुकाराम नवले (नवले बाबा) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. शंभरीच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या या निष्ठावान व्यक्तिमत्त्वाने अखेरचा श्वास घेतला. मात्र आयुष्यभर जपलेली मूल्ये आणि नात्यांवरील विश्वास कायमस्वरूपी मागे ठेवून गेले. नवले बाबा हे केवळ गावातील ज्येष्ठ नव्हते, तर निष्ठा, श्रद्धा आणि समर्पण यांचे जिवंत प्रतीक म्हणून त्यांची ओळख होती. कोपरगावचे विकासमहर्षी स्व. शंकरराव कोल्हे यांच्या सोबत त्यांनी



आयुष्यभर खांद्याला खांदा लावून कार्य केले. या नात्यात कधी पदाचा मोह नव्हता, कधी स्वार्थाची छटा नव्हती, ती होती विश्वासाची आणि आत्मीयतेची अखंड साथ.

वयाच्या ओघात शरीर थकले, पावले मंदावली; मात्र विचारांशी असलेली त्यांची बांधिलकी कधी ढळली नाही. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यातही त्यांच्या ओठांवर एकच नाव आणि मनात एकच विश्वास होता. मुलांना व नातवंडांना त्यांनी दिलेला संदेश त्यांच्या जीवनतत्त्वज्ञानाचा सार ठरला. मी आयुष्यभर कोल्हे कुटुंबासोबत राहिलो; तुम्हीही त्या परिवाराची साथ कधी सोडू नका. हा संदेश केवळ राजकीय नात्याचा नव्हता, तर संस्कारांचा वारसा होता. त्यांनी पुढील पिढीला संपत्ती नव्हे, तर विश्वासाची शिदोरी दिली. त्यांच्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळ्यात व्यक्त केलेले शब्द आज अधिक अर्थपूर्ण वाटतात, माझे दोनच गुरु आहेतः एक म्हणजे नारायणगिरीजी महाराज आणि दुसरे म्हणजे कोल्हे साहेब. श्रद्धा आणि निष्ठा या दोन



आधारस्तंभांवर उभे असलेले त्यांचे आयुष्य शेवटपर्यंत तसेच राहिले. त्यांची शेवटची इच्छाही त्यांच्या आयुष्यभराच्या नात्याची साक्ष देणारी होती. माझा अखेरचा निरोप हा कोल्हे साहेबांच्या नावाने सुरू असणाऱ्या वैकुंठरथातून व्हावा. आज खोपडी गावात शोककळा पसरली असून एक ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व हरपल्याची पोकळी सर्वत्र जाणवत आहे. मात्र नवले बाबा यांचे आयुष्य एक महत्त्वाचा संदेश देऊन गेले. निष्ठा ही वयावर अवलंबून नसते; ती संस्कारांतून घडते आणि शेवटच्या श्वासापर्यंत टिकते. देह गेला, पण विचार जिवंत राहिले. त्यामुळे नवले बाबा यांचे नाव आता केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित न राहता अहिल्यानगर जिल्हाच्या निष्ठेच्या इतिहासातील प्रेरणादायी अध्याय म्हणून स्म रणात राहील. आयुष्यभर निस्वार्थीपणे कार्य करणाऱ्या या अढळ शिलेदाराला खोपडी परिसरातून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

## वयाच्या शेवटही संघर्षाची ज्योत तेवतच

वयाच्या उत्तरार्धात असतानाही त्यांनी अनेक आंदोलनांना आवर्जून भेटी दिल्या. केवळ उपस्थिती लावण्यासाठी नव्हे, तर कार्यकर्त्यांना धीर देण्यासाठी, योग्य दिशा दाखवण्यासाठी आणि संघर्षाची प्रेरणा देण्यासाठी ते मैदानात उतरले. शरीर थकले होते, चालण्यात मंदपणा आला होता; पण विचारांची धार मात्र तशीच तीक्ष्ण होती.

आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी राजकारणाच्या काळात, पद किंवा प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता आंदोलनांच्या ठिकाणी जाणे हे त्यांच्या निष्ठेचे प्रतीक होते. त्यांच्यासाठी आंदोलन म्हणजे केवळ घोषणा नव्हत्या, तर ती समाजाप्रती असलेली जबाबदारी होती. अनेकदा कार्यकर्ते म्हणायचे, ‌‌तुम्ही एवढ्या वयात कशाला त्रास करून घेता?‌‌ त्यावर त्यांचे ठाम उत्तर असे, ‌‌जोपर्यंत श्वास आहे, तोपर्यंत आवाज आहे.‌‌ हीच त्यांची भूमिका आणि हाच त्यांचा स्वभाव. वयोमानाने शरीर जरी अशक्त झाले, तरी मनातील लढाऊ वृत्ती कायम राहिली. त्यांच्या उपस्थितीने आंदोलनस्थळी एक वेगळीच उर्जा निर्माण होत असे. त्यांची शांत पण ठाम भूमिका अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरली. आज ते आपल्या सोबत नसले तरी त्यांनी दिलेला संदेश स्पष्ट आहे. वय कधीच संघर्षाचा अडसर ठरत नाही; जिद्द आणि निष्ठा असली की लढा शेवटपर्यंत देता येतो.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199